**डोंगर परिचय**

सह्याद्री बद्दल चर्चा करण्यापूर्वी डोंगर नावाच्या भौगोलिक रचनेसंबंधी थोडे...

सर्वसाधारण सपाट जमिनीवर तयार झालेले उंचवटे म्हणजे डोंगर. हे हजार फुटांपासून काही मैल उंचीचे असू शकतात. यांची उत्पत्ती निरनिराळ्या कारणांमुळे होत असते, त्यामुळे त्यांच्यात मूलभूत फरक असू शकतात.

पण हे तांत्रिक फरक काहीही असले तरी पृथ्वीवरच्या जीवसृष्टीच्या जगण्यासाठी डोंगर अतिशय महत्वाचे आहेत. यापैकी एक प्राथमिक कारण म्हणजे डोंगरांची जलचक्रातली भूमिका. अगदी थोडक्यात म्हणजे, डोंगर पाण्याच्या अजस्त्र टाक्या म्हणून काम करतात. अर्थात यासाठी त्या डोंगरांवर वनस्पतींचे आवरण अत्यावश्यक आहे.

डोंगरांच्या पृष्ठभागावरील वनस्पतींच्या मुळांना धरून आत मुरलेले पावसाचे पाणी डोंगराच्या पोटातील भूजलधारक खडकांमध्ये (अ‍ॅक्विफर्स) साठते आणि मग लहान मोठे झरे, ओढे, नाले यांच्या रूपाने बाहेर वाहते. समुद्रसपाटीपासून उंचीवर असल्यामुळे गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार हे सर्व पाणी कमी अधिक वेगाने पाझरून खाली येत राहतं. अश्याच नद्या जन्मतात.

केवळ डोंगर आणि त्यावर झाडझाडोरा हे समीकरण जुळलं की मग वनस्पतींची विविधता, मग त्यामुळे इतर सर्व पशु, पक्षी, सूक्ष्मजीव आणि कीटकांची विविधता, त्यांचे अधिवास, अन्नसाखळ्या, परस्परावलंबन आणि निरंतर उत्क्रांती असा पुढचा क्रम ठरलेला असतो. यात अर्थातच मानवाचे ही आस्तित्व आले.

सर्वसाधारणपणे जगात जिथे डोंगर आणि त्यावर अरण्य अशी व्यवस्था कार्यरत असते, तिथे हमखास पाऊस पडतो, मुरतो, साठतो आणि पुढे वितरीत होतो. या मुलभूत सत्यावर सभोवतालच्या मानवाचे प्रगती, विकास वगैरे सगळे इमले आधारित असतात आणि नेमके याचाच सर्वांना विसर पडला आहे.

सह्याद्री ही एक साडेसहा कोटी वर्ष जुनी संस्था आहे असं म्हणलं तरी चालेल. पृथ्वीवरील सर्वात प्रगत, उत्क्रांत आणि बुद्धिमान प्रजाती म्हणून आज आपण सारे मानव या संस्थेचे विश्वस्त आहोत. पण मुळात विश्वस्त ही भूमिका आपण स्वीकारली आहे का, असा प्रश्न मात्र राहून राहून पडतो.

निसर्गातील घडामोडींना अनुसरून होणारे बदल वगळता इथल्या व्यवस्थेत अगदी तीन साडेतीनशे वर्षांपूर्वीपर्यंत फारसा फरक पडला नाही. निसर्गनियमांप्रमाणे उत्क्रांती, नवनवीन प्रजातींची निर्मिती आणि काही जुन्या प्रजाती नामशेष होणे ही प्रक्रिया सुरु होती.

मात्र गेल्या दोन अडीच शतकांमध्ये औद्योगिक क्रांती, साम्राज्यवादी शक्तींचा भारतावर कब्जा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे लोकसंख्येची बेसुमार वाढ अश्या काही बाबींचा थेट परिणाम होऊन या संपूर्ण परिसंस्थेवर ताण पडू लागला. हा ताण आता प्रचंड प्रमाणात वाढला आहे आणि सह्याद्रीचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले आहे.

=================================================================================

**आर्थिक विकास दर - निसर्गाचा ऱ्हास मोजण्याचा मापदंड**

सृष्टीमध्ये सतत बदल होतच असतो, पण बदल होण्याचा वेग आणि कारणांची संख्या गेल्या दोन अडीच शतकात केवळ मानवी हस्तक्षेपामुळे इतके कमालीचे वाढले आहेत की इथल्या कोट्यवधी वर्षांच्या प्रक्रियेतून उभी राहिलेली परिसंस्था आणि विलक्षण समृध्द जैवविविधता सगळीकडून उसवायला लागली आहे. बदल घडल्यावर पुन्हा नवा शाश्वत समतोल शोधण्याची निसर्गाची क्षमताच जणू धोक्यात आली आहे.

पाश्चिमात्य राष्ट्रांनी औद्योगिक संस्कृती आणि जीवनशैली स्वीकारली आणि दुर्दैवी योगायोग असा की त्यांच्या पासून नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या भूतपूर्व वसाहतींना नव्याने आपली वाटचाल सुरु करताना हाच आदर्श मार्ग वाटला. ज्यांनी याला विरोध केला त्यांना जुनाट, विकासाचे विरोधक म्हणून आजतागायत हिणवले जाते. आधुनिक तंत्रज्ञान हेच जगातील सर्व प्रश्नांवरील उत्तर आहे हा समज आज सर्वांच्या मनात अगदी खोलवर दृढ झाला आहे.

औद्योगिक संस्कृती आणि त्यातील अत्याधुनिक सोयी सुविधा हा वास्तविक एक मुखवटा आहे, सर्वसामान्यांना गुंगवून ठेवण्यासाठी एक चित्र रंगवण्यात आले आहे. या आकर्षक जीवनशैलीची खरी गरज माणसाला नसून औद्योगिक अर्थव्यवस्थेलाच

जास्त आहे. ही अर्थव्यवस्था खरी या सगळ्या मागची शक्ती आहे, आणि तिची चक्रे सतत फिरत रहावीत यासाठी समस्त मानवजात कंबर कसून आयुष्यभर राबत आहे. आणि या कोट्यवधी माणसांनी कसलेही प्रश्न न विचारता असेच राबत रहावे, यासाठी 'प्रगती' किंवा 'निरंतर विकास' ह्या संकल्पना जन्माला घालून आपल्या सर्वांच्या गळी उतरवण्यात व्यवस्थेला उत्तम यश मिळालं आहे. आता आपल्यासाठी व्यवस्था आहे का व्यवस्थेसाठी आपण जगतोय, याचं उत्तर देणं अवघड होऊन बसलं आहे.

याच प्रमाणे GDP या अर्थशास्त्रातल्या एका काल्पनिक समीकरणाला 'विकास दर' असं गोंडस नाव देऊन त्याचं निरंतर वाढत राहणे याचा आपल्या 'प्रगती'शी थेट संबंध प्रस्थापित करणे ही तर आजवरच्या मानवी इतिहासातली  सर्वात मोठी फसवणूक मानता येईल. सर्व राष्ट्र, धर्म, भाषा, वंश आदी बाबींच्या पलीकडे जाऊन कोट्यवधी जनतेने एकमताने ही संकल्पना मान्य करणे आणि त्यासाठी सर्वस्व झोकून आयुष्यभर झटणे हा खरोखरीच चमत्कार आहे. GDP या कल्पनेचा उगम काय, तो कसा मोजला जातो, मुळात ते समीकरण अकौंटिंगच्या मुलभूत तत्वानुसार योग्य आहे का, तो असा मोजण्यामागे हेतू काय आहे, तसे करण्यात नेमका कोणाचा फायदा आहे हे किती जणांना माहिती आहे? GDP वाढतो म्हणजे नेमकं काय होतं, नैसर्गिक संसाधनांवर या वाढीचा काय परिणाम होतो, शाश्वतता म्हणजे काय, ती का महत्वाची... फार मोजकी माणसं यावर विचार करायची तसदी घेतात. प्रगती आणि विकास म्हणजे नेमकं काय, त्याची पूर्ण किंमत काय आणि ती कोण चुकवतो याची सुद्धा स्पष्टता अभावानेच आढळते. पण प्रगती चांगली असते असं एक अंधुक काहीतरी मनात घट्ट धरून ठेवलं असतं आणि त्यासाठी लागेल ते करायला आपण तयार असतो. GDP वाढीचा दर, अर्थात आपला आवडता विकासदर, प्रत्येक वर्षी वाढता राहिला म्हणजे झालं. पण तसं घडण्याचे परिणाम काय होतात?

GDP वाढणे म्हणजे औद्योगिक उत्पादन वाढणे म्हणजेच माणसाचा उपभोग वाढणं. माणसाचा उपभोग सतत वाढवायचा तर नवनव्या गरजा तयार केल्या पाहिजेत. म्हणजे जाहिरातबाजी करून नवनव्या वस्तू आणि सेवा विकत घ्यायला भाग पाडलं पाहिजे. चंगळवाद ही खरी या अर्थव्यवस्थेची गरज आहे – कारण माणूस आपल्या खऱ्या गरजांच्या चौकटीत शहाण्यासारखा जगू लागला तर हा चंगळकेंद्रित अर्थव्यवस्थेचा डोलारा कोसळायला वेळ लागणार नाही.

दुसऱ्या बाजूला GDP वाढवायचा म्हणजे उत्पादन वाढवायचं म्हणजेच नैसर्गिक संसाधनांचा आणि उर्जेचा उपयोग वाढवायचा. कारण जगातलं सर्व उत्पादन शेवटी निसर्गातून घेतलेल्या संसाधनापासूनच होते. थोडक्यात GDP जितका वाढेल त्याचा थेट परिणाम नैसर्गिक संसाधनांच्या साठ्यांवर होतो. जगात सर्वत्र हे अगदी सर्रास दिसतं. GDP वाढीचा दर जितका जास्त तितका निसर्गाचा ऱ्हास जास्त झालेला दिसतो, किंवा जिथे निसर्गसौंदर्य आणि पर्यावरण टिकून आहे तिथला GDP वाढीचा दर प्रगत भागांच्या तुलनेने कमी (म्हणजे तो प्रदेश आर्थिक दृष्ट्या 'मागासलेला') आढळतो.

औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून सह्याद्री पर्वतरांगा म्हणजे वेगवेगळ्या नैसर्गिक संसाधनांचा अजस्त्र खजिनाच आहे. पाणी, लोह आणि बॉक्साईट सारखे महत्वाचे धातू, असंख्य वनस्पतीजन्य उत्पादनं, उर्जा, मनुष्यबळ... या सगळ्यावर उद्योगाची दृष्टी पडली आणि त्याचे परिणाम आता सर्वत्र उघड दिसत आहेत.